लोकमत

## सुशोभीकरणाचे काम सुरु : पूर्ण होण्यास दोन महिने लागणार

# विद्यापीठातील शिवपुतळा परिसराला मिळणार नवे रुप

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाची ओळख असलेल्या शिवपुतळा परिसराला आता नवे रुप मिळणार आहे. या परिसराच्या सुशोभीकरणाचे काम विद्यापीठ प्रशासनाकडून सुरु झाले आहे. ते पूर्ण होण्यास दोन महिने लागणार आहेत.

विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा आहे. त्या परिसरात ५० वर्षांपूर्वी बगीचा करण्यात आला. त्याचा एकूण परिसर पाच एकर आहे. त्याच्या सभोवती असणाऱ्या संरक्षक कठड्यांची दुरवस्था झाली आहे. पुतळ्याच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावरील फरशा जीर्ण झाल्या आहेत. त्यांवर पावसाळ्यामध्ये पाणी साठून शेवाळ होते. ही स्थिती या पुतळ्याच्या सौंदर्याला मारक ठरत आहे. ते लक्षात घेऊन या परिसराला नवे रुप देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला. त्यानुसार गेल्या तीन दिवसांपासून या ठिकाणी सुशोभीकरणाचे काम सुरु झाले आहे. त्यासाठी प्रशासनाने ५० लाखांचा निधी मंजूर केला आहे. त्यातून संरक्षक कठड्यांचे दगडी बांधकाम केले जाणार आहे. फरशा बदलण्यात येणार असून फूलझाडांसह विविध नवी झाडे लावली जाणार आहेत. दरम्यान, याबाबत विद्यापीठाच्या स्थापत्य विभागाचे उपकुलसचिव डॉ. जी. एस. कुलकर्णी यांनी सांगितले की, विद्यापीठाच्या मुख्य इमारतीला अनुरुप संरक्षक कठड्यांचे बांधकाम केले जाणार आहे.



**शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोरील शिवपुतळा परिसराच्या सुशोभीकरणाचे काम सुरु झाले आहे.**

> या शिवपुतळा परिसराच्या सुशोभीकरणासाठी विद्यापीठ अधिकार मंडळे, पर्यावरण समितीसह आवश्यक परवानगी घेतल्या आहेत. राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानाअंतर्गत निधी मिळाला आहे. सुशोभीकरणामुळे या परिसराला नवे रुप मिळणार आहे.
>
> **- डॉ. विलास नांदवडेकर, कुलसचिव**

# प्रवेश परीक्षा २८ मेपासून

कोल्हापूर टाइम्स टीम



## विद्यापीठात सहा दिवसांत 32 अभ्यासक्रम परीक्षा

### २७ जूनपासून प्रवेश प्रक्रिया

प्रवेश परीक्षेनंतर विभागनिहाय उपलब्ध असलेल्या जागांची यादी २६ जून रोजी जाहीर करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात २७ जूनपासून प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. दुसऱ्या टप्प्यातील प्रवेश प्रक्रिया १ व २ जुलै रोजी करण्यात येणार आहे.

शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांसाठी घेण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षांना २८ मे पासून सुरुवात होणार आहे. या परीक्षांसाठी ऑनलाइन अर्ज भरण्याची मुदत ४ मे आहे. विलंब शुल्कासह अर्ज भरण्याची मुदत ७ मे तर अतिविलंब शुल्कासह अर्ज भरण्याची मुदत ११ मे पर्यंत आहे. प्रवेशाची अंतिम यादी २६ जून ते २ जुलै या कालावधीत प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

२८ मे रोजी १५ अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा होणार आहे. यामध्ये एम. ए., मास कम्युनिकेशन, एमएस्सी जिओग्राफी, अल्कोहोल टेक्नॉलॉजी, ॲग्रो, केमिकल मॅनेजमेंट, शुगर टेक्नॉलॉजी, जिओलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स, बीजेसी, एमजेसी, बी. लिब. एम. लिब. या विषयांच्या परीक्षा पहिल्या टप्प्यात होणार आहेत. विद्यापीठाच्या अखत्यारित येणाऱ्या २६ केंद्रांवर सकाळी साडेनऊ ते सायंकाळी पाच यावेळेत परीक्षा होणार आहेत.

२९ मे रोजी एमएस्सी केमिस्ट्री, मॅथेमॅटीक्स, फिजिक्स या तीन विषयांच्या परीक्षेचे नियोजन करण्यात आले आहे. केमिस्ट्रीची परीक्षा २१ केंद्रावर, मॅथ्सची व फिजिक्सची परीक्षा प्रत्येकी १८ केंद्रांवर होणार आहे.

३० मे रोजी २८ केंद्रांवर पाच विषयांच्या परीक्षा होणार आहेत. यामध्ये एमएस्सी मायक्रोबायोलॉजी, फार्मा, इंडस्ट्री मायक्रोबायोलॉजी, झुऑलॉजी व बायोकेमिस्ट्री याविषयांच्या परीक्षेचा समावेश आहे.

एक जून रोजी एमएस्सी स्टॅटिस्टिक्स, अप्लाइड स्टॅटिस्टिक्स या अभ्यासक्रमासह एमएस्सी बॉटनी या अभ्यासक्रमाची परीक्षा प्रत्येकी दहा केंद्रांवर होणार आहे. एमसीए परीक्षेसाठी दहा केंद्रांची निवड करण्यात आली असून एमएस्सी कॉम्प्युटर सायन्स या अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अखत्यारीतील ११ केंद्रांमध्ये व्यवस्था करण्यात येणार आहे.

चार जून रोजी एमएस्सी पर्यावरणशास्त्र, फूड ॲंड टेक्नॉलॉजी, रुरल मॅनेजमेंट, एमबीए या अभ्यासक्रमाच्या परीक्षा एकूण २४ केंद्रांवर होणार आहेत. ६ जून रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील तीन केंद्रांवर रुरल स्टडीज, रुरल मॅनेजमेंट व एमएसडब्ल्यू तर ७ जून रोजी वूमन स्टडिज, योगा सायन्स, मुक्त विद्यापीठाचे सर्व अभ्यासक्रम यासाठी प्रवेश परीक्षा होणार आहेत.

# विद्यापीठ प्रवेश परीक्षा; ऑनलाईन अर्ज प्रक्रियेस प्रारंभ

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या विविध अभ्यासक्रमांसाठीच्या प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार दि. १७ एप्रिलपासून ऑनलाईन प्रवेश अर्ज प्रक्रियेस प्रारंभ झाला आहे. विद्यापीठाच्या वतीने दरवर्षी विविध अभ्यासक्रमास प्रवेशासाठी एप्रिल व मे महिन्यात प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. दि. १७ एप्रिलपासून ऑनलाईन अर्ज प्रक्रियेस सुरुवात झाली असून, नियमित शुल्कानुसार दि. ४ मेपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत आहे. दि. २८, २९, ३० मे रोजी विविध विषयांचे अभ्यासक्रम व त्यानंतर दि. १, ४, ६ व ७ जून रोजी ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने प्रवेश परीक्षा घेतल्या जाणार आहेत. याबाबतची माहिती विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यापीठाने जाहीर केलेले अधिकृत वेळापत्रक पाहून विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.